गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ०४ था ● मंगळवार २१ मे २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 04 | Date : 21/05/2024 blow Tuesday Page 4 Price 4


## तब्बल १८ लाखांहून अधिक सिम बंद होणार, सायबर गुन्ह्यांवरील नियंत्रणासाठी सरकारचं मोठं पाऊल

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

ऑनलाइन फसवणूक आणि सायबर गुन्हे सरकारसाठी चिंतेचा विषय बनला असून त्यांच्यावर आता केंद्र सरकारकडून मोठी कारवाई होणार आहे. देशात १८ लाखांहून अधिक संशयास्पद सिम बंद होणार आहेत. या सर्जिकल स्ट्राईकमध्ये सर्व टेलिकॉम कंपन्या सरकारला सहकार्य करणार आहेत. केंद्रीय तपास यंत्रणांनी अशा संशयास्पद सिमची या आधीच तपासणी केली होती. या सिमकार्डच्या मदतीने अनेक प्रकारचे आर्थिक गुन्हे केले जात असल्याचे आढळून आले.

इकॉनॉमिक टाईम्सच्या एका रिपोर्टनुसार, तपासादरम्यान अशा प्रत्येक मोबाईलमध्ये हजारो सिमकार्ड वापरले जात असल्याचे आढळून आले. दूरसंचार विभागाने ९ मे रोजी कंपन्यांना आदेश दिले होते की, २८,२२० मोबाईल फोन





आणि सुमारे २० लाख सिमकार्डचा गैरवापर होण्याची शक्यता आहे. त्यापैकी १८ लाख सिम आणि हजारो मोबाईल फोन प्रभावित होणार असल्याचे निश्चित मानले जात आहे. मोबाईल फोन आणि सिमकार्डच्या मदतीने अलीकडच्या काळात अनेक मोठे आर्थिक गुन्हे घडले आहेत. ऑनलाइन फसवणुकीचे प्रमाण वाढत आहे. अशा परिस्थितीत ही कारवाई करणे अत्यंत । पान २ वर

# आज बारावीचा निकाल

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) आणि कौन्सिल फॉर द इंडियन स्कूल सर्टिफिकेट (सीआयएससीई) एक्झामिनेशनने (सीआयसीएसई) या शिक्षण मंडळांच्या बारावीच्या परीक्षांचे निकाल नुकतेच जाहीर झाले. त्यामुळे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल कधी लागणार याची उत्सुकता निर्माण झाली आहे. राज्य मंडळाने दिलेल्या माहितीनुसार बारावीच्या परीक्षेचा निकाल आज (२१ मे) जाहीर करण्यात येणार आहे.यंदा बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते २३ मार्चदरम्यान घेण्यात आली. यंदा राज्यातील १५.१३ लाख विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. त्यात विज्ञान शाखेसाठी सर्वाधिक सात लाख ६० हजार ४६ विद्यार्थी, कला शाखेसाठी तीन लाख ८१ हजार ९८२, वाणिज्य शाखेसाठी तीन लाख २९ हजार ९०५, व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी ३७ हजार २२६, आयटीआयसाठी चार हजार ७५० विद्यार्थ्यांचा समावेश आहे. सीबीएसई आणि आयसीएसईच्या बारावीचा निकाल यंदा वाढला आहे. त्यामुळे राज्य मंडळाचा निकाल वाढणार की कमी होणार याबाबत उत्सुकता आहे. गेल्यावर्षी राज्याचा बारावीचा निकाल ९१.२५ टक्के लागला होता.

राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे निकाल मंगळवारी जाहीर होणार असल्याची घोषणा केली. विद्यार्थ्यांना दुपारी एक वाजल्यापासून निकाल ऑनलाइन




पाहता येणार आहे. तसेच निकालाची प्रिंट घेता येणार आहे. विद्यार्थ्यांना दरवर्षीप्रमाणे mahahsscboard.in, mahresult.nic.in या संकेतस्थळावरून निकाल पाहता येणार आहे.

ऑनलाइन निकालानंतर बारावीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना स्वतःच्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने मिळवलेल्या गुणांची गुणपडताळणी, उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती, पुनर्मूल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन (http://verification.mahsc.ac.in) स्वतः किंवा कनिष्ठ महाविद्यालयामार्फत अर्ज करता येणार आहे. गुणपडताळणी आणि उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी २२ मे ते ५ जून या कालावधीत ऑनलाइन अर्ज करता येईल. । पान २ वर

## शासकीय सहकार व लेखा पदविका २४ ते २६ मे दरम्यान परिक्षा होणार

**सोलापूर/प्रतिनिधी:**

सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागातर्फे घेण्यात येणारी शासकीय सहकार व लेखा पदविका (जी.डी.सी. ण्ड ए. ) परिक्षा व सहकारी गृहनिर्माण व्यवस्थापन प्रमाणपत्र (सी.एच.एम.) परीक्षा २४, २५ व २६ मे २०२४ रोजी सिध्देवश्र्वर प्रशाला, सिध्देश्र्वर पेठ, सोलापूर या केंद्रावर घेण्यात येणार आहे. सदर परिक्षेसाठी दि.१५ मे २०२४ पासून ऑनलाईलन प्रवेशपत्र उपलब्ध करून देण्यात आली आहेत . ज्या परिक्षार्थिंना तांत्रिक कारणास्तव ऑनलाईन प्रवेशपपत्र मिळू शकले नाही व ज्या परिक्षार्थीचा सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांचेकडून प्राप्त हजेरीपटामध्ये समावेश आहे त्यांना परिक्षेस बसण्यास परवानगी देण्यात येईल. अशा परिक्षार्थींनी स्वत:चा फोटो, ओळखपत्रासाठी आधारकार्ड, वाहन परवाना, मतदान ओळखपत्र, पॅनकार्ड इत्यादी सोबत आणणे आवश्यक असल्याचे जिल्हा उपनिबंधक ( सहकारी संस्था) तथा जी.डी.सी. न्ड ए परिक्षा केंद्र प्रमुख किरण गायकवाड यांनी कळविले आहे.

## ६ जूनपर्यंत आरक्षण द्या, अन्यथा खूप मोठं आंदोलन होईल, मनोज जरांगे पाटलांचा सरकारला इशारा


**मुंबई/दैनिक यश सिध्दि न्यूज**

चार जूनला अंतरवाली सराटीमध्ये आमरण उपोषणाला सुरुवात होणार आहे. आरक्षण घेतल्याशिवाय मी हटणार नाही. ६ जूनपर्यंत आरक्षण द्या, अन्यथा खूप मोठं आंदोलन होईल, असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला दिला आहे. ते छत्रपती संभाजीनगरमध्ये बोलत होते.



मनोज जरांगे पाटील म्हणाले, २१ ते २४ तारखेपर्यंत दौरा आहे. त्यामुळे मी रुग्णालयातून सुट्टी घेतलेली आहे. चार जूनला अंतरवाली सराटीमध्ये आमरण उपोषणाला सुरुवात होणार आहे. आरक्षण घेतल्याशिवाय मी हटणार नाही. आम्हाला लोकसभेच्या गुलालात पडायचं नसून आम्हाला आमच्या आरक्षणाच्या गुलालात पडायचं आहे. आणि तो गुलाल आमच्यासाठी महत्त्वाचा आहे. कारण आमचे लोकं मोठे झाले तर त्यांचा कल्याण होईल. त्यामुळे आमच्या न्यायासाठी आम्ही अंतरवालीत । पान २ वर

## ४ जूनला सर्वजण मिळून जल्लोष करू, चंद्रशेखर बावनकुळे यांचा विश्वास, कार्यकर्त्यांसाठी लिहिलं पत्र



**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

महाराष्ट्रातील ४८ जागांसाठी पाच टप्प्यातील मतदान पार पडले. आज मुंबईसह १३ मतदारसंघात आज मतदान पार पडले. मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी कार्यकर्त्यांना भावनिक पत्र लिहिलेय. लाखो प्रामाणिक कार्यकर्त्यांच्या निष्ठेसमोर नतमस्तक, असल्याचं त्यांनी पत्राच्या माध्यमातून सांगितलेय. त्याशिवाय चार जून रोजी आपण सर्वजण जल्लोष करु, असा विश्र्वासही त्यांनी



व्यक्त केला आहे. घरदार विसरून, अथक परिश्रम करून कोट्यवधी मतदारांपर्यंत पोहोचणाऱ्या भाजपच्या कार्यकर्त्यांचा सार्थ अभिमान आहे. प्रत्येक गाव-खेड्यापर्यंत मोदीजींच्या विकसित भारताचं स्वप्न घेऊन पोहोचलो. राष्ट्रप्रेमानं भारलेल्या लाखो कार्यकर्त्यांची अखंड मेहनत हाच भाजपच्या यशाचा बलदंड पाया रचला. भाजपचे कार्यकर्ते अविश्रांत राबल्यामुळे निवडणुकीत मोठ्या यशाला गवसणी घालणार आहोत. ४ जूनला सर्वजण मिळून जल्लोष करू, असा चंद्रशेखर बावनकुळे यांनी विश्र्वास व्यक्त केलाय.

## पुणे अपघात प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर विशाल अग्रवाल पसार

### पोलिसांची विविध पथकं शोधासाठी रवाना

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणे अपघात प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल पसार झाल्याची माहिती समोर येत आहे. पोलिसांकडून त्याचा शोध सुरू आहे. पुण्यातील ब्रम्हा कॉर्प या बांधकाम उद्योग समूहाचे प्रमुख विशाल अग्रवाल हे पोलिसांना सापडत नसून त्यांना शोधण्यासाठी पोलिस पथके विविध ठिकाणी रवाना करण्यात आली आहेत. विशाल अग्रवाल



यांच्या अल्पवयीन मुलाने दारुच्या नशेत कार चालवून दुचाकीला धडक दिल्याने एक तरुण आणि एका तरुणीचा शनिवारी मध्यरात्री पुण्यातील कल्याणी नगरमधे मृत्यू झाला होता. त्या प्रकरणी विशाल अग्रवाल यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशाल अग्रवाल यांचा मुलगा वेदांत अग्रवाल हा अल्पवयीन असल्याचे कारण देत न्यायालयाकडून त्याला जामीन मंजूर करण्यात आला. मात्र अल्पवयीन असूनही त्याला पोर्शे कार चालवायला दिल्याबद्दल विशाल अग्रवाल यांच्यावर मोटर वाहन अधिनियमाच्या कलम ३, ५ आणि १९९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. त्याचबरोबर आपला अल्पवयीन मुलगा दारू पितो हे ठाऊक असूनही त्याला पार्टी करण्यास परवानगी दिल्याबद्दल विशाल अग्रवाल यांच्यावर बाल न्याय अधिनियमनाच्या कलम ७५ आणि ७७ अंतर्गत आखणी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुणे पोलिसांनी विशाल अग्रवाल यांच्यावर गुन्हा दाखल केल्यानंतर मात्र विशाल अग्रवाल हे आता नॉट रीचेबल झाल्याची माहिती आहे. त्यांच्या शोधासाठी पोलिसांची विविध पथके रवाना करण्यात आली आहेत.

पुण्यातील कल्याणीनगरमध्ये घडलेल्या अपघाताला संबंधित कारचालक मुलाच्या वडीलांना कारणीभूत ठरवलंय. याप्रकरणी कारचालक मुलाचे वडील विशाल अग्रवाल आणि त्याला दारु देणाऱ्या दोन पब चालकांवर गुन्हा दाखल करण्यात आलाय. मुलगा अल्पवयीन असूनही त्याला कार चालवायला दिल्याबद्दल विशाल अग्रवाल यांच्यावर कारवाई करण्यात आलीये.

तर मुलाला दारु देणारे हॉटेल काझीचे मालक प्रल्हाद भुतडा आणि मॅनेजर सचिन काटकर त्याचबरोबर हॉटेल ब्लॅकचे संदीप सांगळे आणि बार काऊंटर जयेश बोनकरवर गुन्हा दाखल करण्यात आलाय. पोलिसांकडून विशाल अग्रवाल यांच्या मुलाला विशेष वागणूक देण्यात आल्याचा आरोप करत आहे. या प्रकरणात आरोपीला कोणती विशेष वागणूक दिली असल्यास, त्यावेळचे पोलिस ठाण्यातील सीसीटीव्ही तपासून ते खरे असेल तर तत्काळ संबंधितांवर निलंबनाची कारवाई करा, अशाही सूचना देवेंद्र फडणवीस यांना दिला आहे.

## सुंदरम नगर येथील जलतरण तलाव सुरु करा : मा.आमदार दिलीप माने

### शेतकरी व शहरातील प्रश्नासाठी माजी आमदार दिलीपराव माने यांनी घेतली जिल्हाधिकाऱ्यांची भेट

**सोलापूर/प्रतिनिधी :**

सुंदरम नगर येथील असलेला जलतरण तलाव दुरुस्त करून या भागातील नागरिकांसाठी सुरू करावा, गतवर्षी पडलेला दुष्काळामुळे नुकसान झालेल्या उत्तर व दक्षिण सोलापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना दुष्काळी मदत मिळावी, खरीप पिकाचे पेरणीसाठी शेतकऱ्यांना आवश्यक खत उपलब्ध करून द्यावा, शहरातील होल्डिंग स्ट्रक्चरल ऑडिट करावे, कुमठे लमाण तांडा व साखरेवाडी येथे स्वतंत्र मतदान केंद्र करण्याची मागणी माजी आमदार दिलीपराव माने यांनी जिल्हाधिकारी यांना भेटून केली.

दक्षिण व उत्तर सोलापूर, सोलापूर शहर, तालुक्यातील विविध प्रश्र्न संदर्भात माजी आमदार दिलीपराव माने यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी



गंगाधर बिराजदार, प्रथमेश पाटील, बाळासाहेब पाटील, संजय जाधव, उमेश भगत, ज्ञानोबा साखरे, महेश घाडगे, सतीश मस्के, गणपत बचुटे, नितीन भोपळे, अनिल हिबारे, रेवनसिद्ध साखरे, अजय बचुटे, सुनील जाधव, अजय सोनटक्के, मुजफ्फर जहागीरदार, गुरुबाळा पाटील, संजय लोणारी, रवींद्र पाटील, अमोगसिद्ध पाटील, अशोक कलशेट्टी, बसवराज पाटील आदि मान्यवर उपस्थित होते. सुंदरम नगर येथील जलतरण तलाव बंद अवस्थेत असून याची तातडीने दुरुस्ती करून हा जलतरण तलाव जुळे सोलापूर भागातील नागरिकांसाठी सुरू करण्याची मागणी माने यांनी केली. गतवर्षी जिल्ह्यात पडलेल्या दुष्काळामुळे खरीप पिके पूर्णपणे जळून गेली. मात्र केवळ पाच तालुक्याच्या समावेश दुष्काळी तालुके म्हणून तर उर्वरित सहा तालुका यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर केली. यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊनही दुष्काळी मदत मिळाली नसल्याचे सांगून दक्षिण व उत्तर सोलापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना त्वरित मदत मिळवून देण्याची मागणी केली.

हवामान खात्याचे अंदाज नुसार यावर्षी पर्जन्यमान । पान २ वर

# संपादकीय

## कांदा निर्यात कळीचा मुद्दा..

केवळ दिंडोरीच नव्हे तर नाशिक, पुणे, सोलापूर, जळगाव, धुळे, अहमदनगर आणि सातारा येथे कांद्याचे उत्पादन घेतले जाते. मोदी सरकारने निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांच्या हितासाठी घेतलेला हा निर्णय आता अंगलट आला आहे. त्यामुळे बऱ्याच ठिकाणचे उमेदवार पराभूत होण्याची दाट शक्यता आहे. याविषयीची जाणीव उशिरा झाल्याने काही दिवसांपूर्वीच कांदा निर्यातबंदी मागे घेण्याची घोषणा करण्यात आली. परंतु, तोपर्यंत शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. अनेकांनी मातीमोल किमतीत कांदा पीक व्यापाऱ्यांना विकले होते. त्यातच निर्यातबंदी अटी, शर्थी टाकून उठवण्यात आल्याने शेतकरीवर्ग नाराज आहे. किमान निर्यातमूल्य व निर्यात शुल्काच्या अटी ठेवून निर्यात खुली केल्यास शेतकऱ्यांना याचा काहीही फायदा होणार नाही. आंतरराष्ट्रीय बाजारात कांद्याला सरासरी १२० रुपये किलो दर आहे. बिनशर्त निर्यात खुली झाली असती तर शेतकऱ्यांच्या हातात प्रतिकिलो ३५ ते ४० रुपये पडले असते. चाळीत साठवलेल्या कांद्याचा उत्पादन खर्च किमान २५ रुपये असेल आणि वरीलप्रमाणे दर मिळाला असता तर दहा ते पंधरा रुपये प्रतिकिलो नफा झाला असता. म्हणजे एकरी लाख दीड लाख रुपये पदरात पडले असते, निर्यातबंदी उठवल्यानंतरही दर फारसे न वाढल्याने नाराजीत अधिक भर पडली आहे. ही बाब उशिरा लक्षात आल्यानंतर आता मोदींनी आपल्या भाषणात ऑपरेशन ग्रीन अंतर्गत कांदा वाहतुकीवर अनुदान देण्याची घोषणा केली, तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कांद्यासंदर्भात लवकरच नवी व्यवस्था करण्याची घोषणा केली. शेतकरी सरकारी मदतीशिवाय स्वयंपूर्ण होऊ शकतील अशी ही व्यवस्था असेल, असेही त्यांनी सांगितले. छगन भुजबळ यांनीही पंतप्रधानांना पत्र देत विषयाचे गांभीर्य पटवून दिले. निवडणुकीत शेतकऱ्यांच्या नाराजीचा फटका बसण्याची दाट शक्यता लक्षात आल्यानंतर सरकारमधील नेत्यांनी या घोषणा केल्याने त्याचा फारसा सकारात्मक परिणाम कांदा उत्पादक मतदारसंघावर होणार नाही, असे दिसते. त्यामुळे यंदा मोदींचे सरकार जर केंद्रात आले नाही तर त्याला काही प्रमाणात कांदा निर्यातबंदीही कारणीभूत असेल हे लक्षात घ्यावे. यंदा कांदा निर्यातबंदीचा मुद्दा कळीचा बनला आहे.

# देशात पाचव्या टप्प्यात एकूण ५६.६८ टक्के मतदान; पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक तर महाराष्ट्रात कमी मतदान

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या आणि महाराष्ट्रातील शेवटच्या टप्प्यातील मतदान आज पार पडलं. महाराष्ट्रातील मुंबईमधील सहा मतदारसंघ तसेच भिवंडी, नाशिक, दिंडोरी, धुळे, ठाणे, कल्याण, पालघर, या १३ मतदारसंघात आज मतदान पार पडलं आहे. महाराष्ट्रात सायंकाळी ५ वाजेपर्यंत ४८.६६ टक्के मतदान झालं आहे. देशात आज (२० मे) सात राज्य आणि दोन केंद्रशासित प्रदेशात ४९ लोकसभा मतदारसंघात मतदान पार पडलं.

यामध्ये सायंकाळी ५ वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार देशात एकूण ५६. ६८ टक्के मतदान झालं.

यामध्ये पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक ७३ टक्के मतदान झालं आहे. महाराष्ट्रात सर्वात कमी ४८.६६ टक्के मतदान झालं आहे. दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या आणि पाचव्या टप्प्यांमध्ये दुसऱ्या राज्यांच्या तुलनेत पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक मतदान झाले आहे.

कोणत्या राज्यात किती टक्के मतदान झाले?

देशात आज पाचव्या टप्प्यातील मतदान पार पडले. यामध्ये एकूण ४९ लोकसभा मतदारसंघात मतदान पार पडले. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, सायंकाळी ५ वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार, देशात एकूण ५६.६८ टक्के मतदान झाले. पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक ७३ टक्के तर महाराष्ट्रात सर्वात कमी ४८.६६ टक्के मतदान झाले आहे. तसेच उत्तर प्रदेशमध्ये ५५.८० टक्के,

**महाराष्ट्रातील कोणत्या मतदारसंघात किती मतदान झालं?**

**नाशिक– ५१.१६ टक्के**
**पालघर – ५४.३२ टक्के**
**ठाणे – ४५.३८ टक्के**
**धुळे– ४८.८१ टक्के**
**भिवंडी– ४८.८९ टक्के**
**दिंडोरी – ५७.०६ टक्के**
**कल्याण – ४१.७० टक्के**
**मुंबई उत्तर पूर्व – ४८.६७ टक्के**
**मुंबई उत्तर – ४६.९१ टक्के**
**मुंबई दक्षिण मध्य – ४८.२६ टक्के**
**मुंबई उत्तर पश्चिम – ४७.७९ टक्के**
**मुंबई दक्षिण – ४४.२२ टक्के**
**मुंबई उत्तर मध्य – ४७.३२ टक्के**

बिहारमध्ये ५२.३५ टक्के, झारखंडमध्ये ६१.९० टक्के, ओडिशामध्ये ६०.५५ टक्के, जम्मू आणि काश्मीरमध्ये ५४.२१ टक्के आणि लडाखमध्ये ६७.७५ टक्के मतदान झाले आहे.

मुंबईत काही मतदारसंघात संथगतीने मतदान

मुंबईतील सहा मतदारसंघासाठी आज मतदान पार पडले. यामध्ये मुंबई उत्तर पूर्व, मुंबई उत्तर, मुंबई उत्तर पश्चिम, मुंबई दक्षिण मध्य, मुंबई दक्षिण, मुंबई उत्तर मध्य या मतदारसंघात मतदान झाले. मात्र, अनेक मतदान केंद्रावर संथगतीने मतदान पार पडल्यामुळे मतदारांची मतदान केंद्रावर मोठी गर्दी झाली होती. दरम्यान, आज महाराष्ट्रातील पाचही टप्प्यांतील मतदान पार पडले. या निवडणुकीसाठी अनेक राजकीय नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती.

# बापरे! एका रात्रीत शेतकरी झाला अब्जाधीश, खात्यावर आले तब्बल ९९ अब्ज ९९ कोटी ९४ लाख रुपये

**लखनौ/दैनिक यशसिध्दि न्यूज**

सध्याचं जग हे तंत्रज्ञानाचं जग आहे. हातातील मोबाईलच्या मदतीने तुम्ही तुमचे बँकेचे सर्व व्यवहार करू शकता. मात्र कधीकदी याच आधुनिक तंत्रज्ञानामुळे मोठी अडचण निर्माण होते. याचा फटका कधीकधी बँकेला तर कधीकधी सामान्य ग्राहकांना बसतो. असाच एक प्रकार उत्तर प्रदेशमधील भदोही जिल्ह्यात घडला आहे. बँकेच्या तांत्रिक बिघाडामुळे हा शेतकरी एका रात्रीत थेट अब्जाधीश झाला आहे. या घटनेची सध्या सगळीकडे एकच चर्चा होत आहे. हा शेतकरी एका रात्रीत अब्जाधीस कसा झाला असे विचारले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार उत्तर प्रदेशमधील भदोही जिल्ह्यातील अर्जूनपुरू येथील रहिवासी असलेल्या एका युवा शेतकऱ्याच्या खात्यात थेट ९९ अब्ज रुपये ट्रान्सफर झाले आहेत. खात्यावर एवढी सारी रक्कम पाहून हा शेतकरी तसेच बँक मॅनेजरदेखील थक्क झाला आहे. सध्या बँकेने या शेतकऱ्याचे खाते होल्ड केले आहे.

नेमके प्रकरण काय?

मिळालेल्या माहितीनुसार ज्या शेतकऱ्याच्या बँक खात्यात अब्जो रुपये ट्रान्सफर झाले, त्या शेतकऱ्याचे नाव भानुप्रकाश बिंद असे आहे. त्यांचे सुरियावां येथील बँक ऑफ बडोदा या बँकेत खाते आहे. त्यांच्या या खात्यात १६ मे रोजी अचानक ९९९९९४९५९९९.९९ रुपये (९९ अब्ज ९९ कोटी ९४ लाख ९५ हजार ९९९ रुपये) दिसायला लागले. बँक खात्यात एवढे सारे पैसे पाहून बँकेचे अधिकारीदेखील चकित झाले. बँकेच्या अधिकाऱ्यांनी ही माहिती लगेच खातेदार भानुप्रकाश बिंद यांना दिली. ही सूचना मिळताच बिंद यांनीदेखील बँकेत धाव घेतली. बँकेत एवढी सारी रक्कम पाहून तेदेखील चकित झाले.

बँकेच्या मॅनेजरने काय सांगितले?

येथील बँक ऑफ बडोदाचे प्रभारी अध्यक्ष आशीष तिवारी यांनी या प्रकाराबद्दल सविस्तर माहिती दिली आहे. खातेधारक भानुप्रकाश यांचे बँकेत केसीस खाते आहे. या खात्यातून त्यांनी कर्ज घेतलेले आहे. त्यांचे खाते आता एनपीए झाले आहे. त्यामुळेच त्यांच्या खात्यात चुकीची रक्कम दाखवली जात आहे. सॉफ्टवेअरमधील चुकीमुळे ऋण चिन्हा लागले नाही. त्यामुळेच हा घोळ झाला, असे तिवारी यांनी सांगितले. या घटनेनंतर योग्य ती कारवाई करण्यात आली आहे. सध्या भानूप्रताप यांचे बँक खाते होल्ड करण्यात आले आहे.

# पूर्व विभाग वाचनालयातर्फे मोफत तेलुगू भाषा प्रशिक्षण वर्ग

सोलापूर/प्रतिनिधीः पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाच्यावतीने दरवर्षी नवनवीन उपक्रम राबविले जातात. यामध्ये तेलुगू प्रशिक्षण वर्ग, वाचन व लेखन वर्ग, उन्हाळी छंद वर्ग, संस्कार वर्ग इत्यादी वेगवेगळे वर्ग घेतले जातात याचाच एक भाग म्हणून मोफत तेलुगू भाषा प्रशिक्षण म्हणजेच वाचन व लेखन वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या २७ मे ते १ जून दरम्यान हा वर्ग घेण्यात येणार आहे. या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक म्हणून तिरुपती श्रीमल यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. दररोज सायंकाळी ६ ते ७ यादरम्यान याची वेळ असणार आहे. प्रशिक्षणासाठी पूर्व नावनोंदणी आवश्यक आहे. नावनोंदणीसाठी पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय कन्ना चौक सोलापूर येथे प्रत्यक्ष येऊन किंवा ८०१०९१३५६६ या मोबाइल क्रमांकावर नोंदणी करावी. तसेच या प्रशिक्षणाचा ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, विद्यार्थिनी, महिला, बालवाचक, तेलुगू भाषा प्रेमी यांनी जास्तीतजास्त संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी आणि कार्यवाह अरविंद चिन्नी यांनी केले आहे.

पान १ वरुन

## तब्बल १८ लाखांहून अधिक..

गरजेचे झाले आहे.

नॅशनल सायबर क्राइम रिपोर्टिंग पोर्टल (NCRP) नुसार, २०२३ मध्ये सायबर गुन्ह्यातील पीडितांना सुमारे १०,३१९ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. संसदेच्या एका समितीने सांगितले होते की, २०२३ मध्ये आर्थिक गुन्ह्यांच्या सुमारे ६.९४ लाख तक्रारी नोंदवण्यात आल्या होत्या. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सी आणि टेलिकॉम कंपन्या टाळण्यासाठी, फसवणूक करणारे भामटे हे इतर टेलिकॉम सर्कलमध्ये जातात आणि सिम कार्ड वापरतात. तसेच एकाच फोनमध्ये अनेक सिम बदलत राहतात. हे लोक काही कॉल केल्यानंतरच सिम बदलतात.

गेल्या वर्षीही टेलिकॉम कंपन्यांनी सायबर गुन्ह्यांशी संबंधित २ लाखांहून अधिक सिम बंद केले होते. यानंतर हरियाणातील मेवातमध्ये जवळपास ३७ हजार संशयास्पद सिम ब्लॉक करण्यात आले. सरकारने टेलिकॉम कंपन्यांना वेळोवेळी संशयास्पद सिमवर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## आज बारावीचा निकाल

उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकनासाठी ऑनलाइन अर्ज मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन करण्यासाठी आधा उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य असून छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून कार्यालयीन कामाच्या पाच दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपद्धतीचा अवलंब करून संबंधित विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे.

बारावीच्या परीक्षेत सर्व विषयांसह प्रविष्ट होऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लगतच्या दोनच संधी (जुलै–ऑगस्ट २०२४ व फेब्रुवारी–मार्च २०२५) श्रेणीसुधार योजनेअंतर्गत उपलब्ध राहतील.जुलै–ऑगस्ट २०२४ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या पुरवणी परीक्षेसाठी पुनर्परिक्षार्थी, श्रेणीसुधार विद्यार्थ्यांना २७ मेपासून मंडळाच्या संकेतस्थळावरुन ऑनलाइन अर्ज भरता येईल. त्याबाबतचे परिपत्रक स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

## ६ जूनपर्यंत आरक्षण द्या,..

एकवठणार आहोत.

मराठा आणि कुणबी एकच आहे. सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी करावी. हैदराबादचा गॅझेट लागू करावा, याच आमच्या प्रमुख मागण्या आहेत. ठरल्याप्रमाणे आम्हाला ६ जून पर्यंत आरक्षण द्यावे अन्यथा हे आंदोलन खूप मोठे होईल. ठरल्याप्रमाणे आम्हाला ६ जून पर्यंत आरक्षण द्यावे अन्यथा हे आंदोलन खूप मोठे होईल, असंही मनोज जरांगे पाटील म्हणाले.

लोकसभा निवडणुकीत मनोज जरांगेंचा फायदा मला व बीडमधील बजरंग सोनवणेंना झाला, अशी जाहीर कबुली परभणीचे उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे उमेदवार संजय उर्फ बंडू जाधव यांनी रविवारी दिला होती. कालपर्यंत वेगळी होणारी निवडणूक एकदम जातीवर गेली. त्याचा दगाफटका भविष्यात काय काय होईल हे आत्ताच सांगू शकत नाही. पण, दोन समजात वितुष्ट निर्माण झालंय ही वस्तूस्थिती आहे. जे पेरलं तेच उगवणार, ज्या पद्धतीने लोकांनी महादेव जानकरांचा प्रचार केला, त्याची रिएक्शन मराठा समाजात उमटली . त्यामुळे मराठा समाज एकटवून माझ्या पाठिशी उभा राहिला. हे मी मानणारा आहे, असंही बंडू जाधव यांनी म्हटलं होतं.

## सुंदरम नगर येथील जलतरण

चांगले सांगितले जात असून शेतकऱ्यांना खरीप पिकाच्या पेरणीसाठी आवश्यक असलेली खते उपलब्ध करून देण्याची मागणी केली. कुमठे (तालुका उत्तर सोलापूर) येथील लमाण तांड्यावर १२०० मतदार असून मतदारांचे सोयीसाठी लमाण तांडा येथे मतदान केंद्र असणे आवश्यक असून येथील मतदार संख्या, परिसरातील वस्तीवरील मतदार यांच्या सोयीसाठी कुमठे लमाण तांडा येथे मतदान केंद्र करण्याची मागणी केली. तर साखरेवाडी (तालुका उत्तर सोलापूर) या गावी सुमारे ७०० मतदार असून या त्यांना २.५०० किलोमीटर अंतरावर कळमण या गावी मतदानास यावे लागते. त्यामुळे मतदार मतदानाच्या हक्कापासून वंचित राहतात. यासाठी साखरेवाडी येथे स्वतंत्र मतदान केंद्र करण्याची मागणी माने यांनी केली. औज ते चिंचपूर बंधार्या दरम्यान भिमा नदी काठावर असलेल्या शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना केवळ दोन तास तर वरील भागातील शेतकऱ्यांना सहा तास वीज पुरवठा करण्यात येतो. औज, कुरघोट, टाकळी, चिंचपूर या गावातील नागरिकांचे पिण्याचे पाणी, वस्तीवरील राहणारे नागरिक, शेतकरी, जनावरे यांच्या पिण्याचे पाण्याच्या सोयीसाठी व उपलब्ध पाणी, शेतीपिकास देण्यासाठी सहा तास वीज पुरवठा करण्याची आग्रही मागणी केली. यावेळी चर्चेअंती चार तास तरी वीजपुरवठा देण्यात यावा असे माने यांनी सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सर्व विषयावर सकारात्मक चर्चा केली.




# उद्धव ठाकरे पंतप्रधानपदाचा चेहरा असू शकतात का? शरद पवारांनी सविस्तर सांगितलं!

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**



गेल्या काही वर्षा भारतीय जनता पक्षाकडून विरोधी पक्षांना तुमच्या पंतप्रधानपदाचा चेहरा कोण ? अशी विचारणा करण्यात येत होती. काही दिवसांपूर्वी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे (णववहर्रीं ढहरलज्ञशीरू) यांनी एका वृत्तवाहिनीला मुलाखत दिली. या मुलाखतीत ठाकरे यांनी मी देखील पंतप्रधानपदाचा चेहरा असू शकतो, असा दावा केला होता. दरम्यान, उद्धव ठाकरे पंतप्रधानपदाचा चेहरा असू शकतात का? या प्रश्नावर राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार (डहरीव झरुरी) यांनी भाष्य केलं आहे. 'एबीपी माझा'ला दिलेल्या विशेष मुलाखतीत शरद पवार पंतप्रधानपदाचा चेहरो कोण असेल? याबाबत सविस्तर भाष्य केलं आहे.

काय म्हणाले शरद पवार?

मी देखील पंतप्रधानपदाचा चेहरा असू शकतो, असा दावा केला होता. यावर तुम्हाला काय वाटतं? असा सवाल शरद पवार यांना विचारण्यात आला होता. यावर बोलताना शरद पवार म्हणाले, कोणीही असू शकतं. लोकशाहीमध्ये लोक म्हणत असतील तर निश्चितपणाने असं होऊ शकतं. चेहरा नाही म्हणजे काय? देशात अनेक अशा निवडणूक झाल्या आहेत. उदाहरण सांगायचे झाले तर १९७७ साली निवडणूकीला लोक जयप्रकाश नारायण यांच्या बाजूने...निवडणूक झाल्यानंतर जनता पक्षाची स्थापना झाली. त्या निवडणुकीत कोणाचा चेहरा समोर नव्हता. निवडणूक झाल्यानंतर खासदारांची संख्या चांगली आली. त्यानंतर बैठक बोलावण्यात आली आणि त्यातून मोरारजी देसाई यांची निवड झाली. निवडणूकीत मोरारजी भाईंना प्रोजेक्ट केलेलं नव्हतं. त्यानंतर सरकार सुद्धा बनलं. त्यामुळे चेहरा नाही म्हणणे हे शहानपणाचे नाही. या निवडणूकीत मोदींचा चेहरा लोकांना पसंत आहे की नाही? हे निवडणूक झाल्यानंतर समजेल.

मूळ प्रश्नाला बगल देऊन, मोदी व्यक्तीगत हल्ले करत आहेत

मोदींना आत्मविश्वास राहिलेला नाही. त्यांचा विश्वास ढळलेला नाही. शेवटी सभा किती घ्यायच्या हा त्या पक्षातील नेतृत्वाचा अधिकार आहे. पण सभा घेऊन सांगत काय आहेत? तर व्यक्तीगत हल्ले करत आहेत.

देशात महागाईचा प्रश्न आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न आहेत. त्यावर उपाय काय हे सांगण्याची त्यांची जबाबदारी आहे. पण मोदींनी या निवडणुकीत लोकांची निराशा केली आहे. मूळ प्रश्नाला बगल देऊन मला भटकती आत्मा म्हणाले. राहुल गांधींना शहेजादा म्हणाले. उद्धव ठाकरेंच्या संघटनेसंबंधी काहीही बोलू लागले, असं शरद पवारांनी नमूदं केलं.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble



# शेतकऱ्यांचे फळबागेचे प्रचंड नुस्कान, पंचनामे करावे

**पंढरपूर/प्रतिनिधी**

करमाळा शहर व तालुक्यातील पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांच्या फळबागाची मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे करमाळा तालुक्यातील ग्रामीण भागात असंख्य शेतकऱ्यांनी केळी या महत्त्वाच्या पिकासह इतर फळबाळा लावल्या होत्या वादरे वाड्यामुळे व फळ बघायचे मोठे नुकसान झाले आहे

त्यांची पंचनामे शासकीय यंत्रणेने ताबडतोब करावे अशी मागणी शेतकऱ्याकडून होत आहे करमाळा शहरात वादळी वाऱ्यामुळे अनेक घरांचेही नुकसान झाले आहे

# कळंब मध्ये परत एकदा जबरी दरोडा



**कळंब/प्रतिनिधी**

शहरात दरोड्याची मालिका कायम चालु असून व्यापाऱ्यांना लक्ष केले जात आहे. रविवारी पहाटेच्या सुमारास कळंब येथील लक्ष्मी रोडवर ब्रिजलाल मुंदडा यांच्या श्री गणेश ट्रेडर्स कंपनी या दुकानावर दरोडा पडला. विशेष म्हणजे दुकानाचे शटर गॅस कटरने कापून आठ चोरट्याने व्यापाऱ्याच्या घरावर हल्ला चढवला सुदैवाने यात कोणीही जखमी झाले नाही व्यापारी आणि पोलिसांच्या प्रयत्नातून तीन आरोपींना पकडण्यात आले आहे. रात्री दोन ते साडेतीन च्या आसपास चोरीच्या उद्देशाने शटर कापून सात ते आठ दरोडेखोराणी आत मध्ये प्रवेश केला. दरोडेखोरांनी रोख एक लाख रुपये व सोने, चांदीचे दागिने चोरी केले. त्यानी रॉड व दगड याचा हत्यार म्हणून वापर केला. चोरट्याने सीसीटीव्हीची ही तोडफोड केली. चोरटे व व्यापारी यांच्यात झटापट झाली मात्र काही अनुचित प्रकार घडला नाही. पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने सुरू केली आहेत.यातील आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश आल्यामुळे उर्वरित फरार आरोपींना लवकरात लवकर पकडणे शक्य होईल. पुढील कार्यवाहीसाठी धाराशिव येथील स्वान पथकाला पाचारण करण्यात आल्याची माहिती पोलीस निरीक्षक रवी सानप यांनी  दिली आहे.

### मान्सूनपूर्व तयारीबाबत छत्रपती संभाजीनगर विभागाचा आढावा

# नैसर्गिक आपत्ती, पुरामुळे जीवित व वित्तीय हानी होणार नाही याची दक्षता घ्यावी : विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड

**छत्रपती संभाजीनगर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

यावर्षी मान्सूनचे लवकर आगमन होणार असल्याचा हवामान खात्याचा अंदाज असून यापूर्वीची काही भागातील अतिवृष्टी व पुरपरिस्थिती लक्षात घेता यावर्षी नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवा तसेच नैसर्गिक आपत्ती किंवा पुरामुळे जीवित व वित्तीय हानी होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड यांनी दिले.




छत्रपती संभाजीनगर विभाग मान्सून पूर्व तयारीबाबत आढावा बैठक विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड यांच्या अध्यक्षतेखाली आज विभागीय आयुक्त कार्यालयातील सभागृहात पार पडली. यावेळी परभणीचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, जालना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, बीड जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे, हिंगोली जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, नांदेड जिल्हाधिकारी अभिजित राऊत, लातूर जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे, धाराशिव जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, मनपा आयुक्त, निवासी उपजिल्हाधिकारी तसेच विविध यंत्रणांचे प्रमुख हे संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालय येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. तर छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, कर्नल ऋषिकेश सुर्यवंशी, जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता विजय घोगरे, उपायुक्त जगदिश मिनीयार, नयना बोंदार्डे, सुरेश वेदमुथा, लीस पोरे, अतिरिक्त आयुक्त रणजित पाटील यांच्यासह प्रादेशिक विभागप्रमुख बैठकीला उपस्थित होते.

विभागीय आयुक्त श्री. अर्दड म्हणाले की, पावसाळ्यात काही गावांचा संपर्क तुटतो. त्यादृष्टीने नागरिकांची निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था तसेच धान्य, औषधसाठा आदी सामुग्रीबाबत नियोजनपुर्वक व्यवस्था करावी. दूषित पाण्यामुळे साथीचे आजार पसरू नयेत यासाठी जलस्त्रोतांची गुणवत्ता तपासण्याबरोबरच आवश्यक तिथे पर्यायी व्यवस्था करावी. अवकाळी पावसानंतर वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी 'महावितरण'ने तत्परतेने नियोजन करावे. जिल्हा व तालुकास्तरावर असलेला नियंत्रण कक्ष २४x७ नेहमी कार्यान्वित ठेवावा. आपत्ती काळात त्वरित संपर्क करण्यासाठी विविध आवश्यक विभागांचे आणि संपर्क यंत्रणांचे संपर्क क्रमांक अद्ययावत ठेवावेत, तसेच हे क्रमांक नेहमी सक्रीय असतील याची दक्षता घ्यावी. एसडीआरएफ तसेच एनडीआरएफची बचाव पथके स्थापन करून आवश्यक साहित्यानिशी सुसज्ज ठेवा, असे निर्देश त्यांनी यंत्रणेला दिले.

विजेला अटकाव करणारी यंत्र सुस्थितीत असावी. नादुरुस्त स्थितीत असलेली वीज अटकाव यंत्र तात्काळ दुरुस्त करून घेण्यासोबतच जिल्हानिहाय या यंत्रणेत प्रत्येक वर्षी १०० ने वाढ करावी. महानगरात असलेले मोठे नाले, नदी यावर ये-जा करण्यासाठी असलेला लोखंडी मार्ग चांगला आहे किंवा कसे याबाबत तपासणी करावी, आवश्यकता असेल तिथे तातडीने बदल करावा. महानगरातील नाल्यांची सफाई कामे तातडीने पूर्ण करावी.

जीर्ण इमारती, पूलांचे सर्वेक्षण करून सुरक्षिततेबाबतही तत्परतेने तपासणी करावी. महानगरातील ज्या भागात पावसाळ्यात आपत्कालीन परिस्थिती उद्भवते, त्यासाठी तेथील नागरिकांचे स्थलांतर कुठे करावे याबाबत पूर्वतयारी करावी. अशा सूचनाही विभागीय आयुक्त श्री अर्दड यांनी दिल्या.

घाटकोपर, मुंबई येथे जाहिरात फलक कोसळण्याची घटना घडली आहे. मान्सून पूर्व कालावधीत व अन्य कालावधीत होणाऱ्या दुर्घटनामध्ये जीवितहानी टाळण्यासाठी शहरी भागातील व महामार्गावरील लावण्यात आलेल्या जाहिरात फलकांची रचनात्मक तपासणी करण्यात यावी.

तपासणीअंती आढळून आलेले अवैध जाहिरात फलकाबाबत संबधितावर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात यावी. आपल्या अधिनस्त क्षेत्रात जाहिरात फलक कोसळून होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी दक्षतेची बाब म्हणून नैसर्गिक आपत्तीच्या वेळी जाहिरात फलकाच्या आजूबाजूला न थांबण्याबाबत नागरिकांना सूचना देण्याचे निर्देशही त्यांनी यंत्रणेला दिले.

मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील संभाव्य पूरबाधित तसेच दुर्गम गावे, बचाव पथकांची मोटर बोट, लाईफ जॅकेट, लाईफ रिंग्ज, रोप बंडल, सर्च लाईट, मेगा फोन, ग्लोव्हज, रेनकोट, स्कूबा डायव्हिंग कीट, हेल्मेट आदी विविध साधने, बचाव पथकांची मॉक ड्रिल, संरक्षित निवारा व भोजन व्यवस्था, पिण्याचे पाणी, विज पुरवठा, नियंत्रण कक्ष, विजेचे संकेत देणारे दामिनी प, नदी-नाल्यांची सफाई व खोलीकरण आदी बाबीं संदर्भात पूर्वतयारीबाबत जिल्हानिहाय जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त यांनी बैठकीत माहिती दिली. यावेळी आपत्ती विभागाशी सबंधित विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# देशाला हुकूमशाहीतून बाजूला करण्यासाठी महाविकास आघाडीला विजय करा : आदित्य ठाकरे



**नाशिक/दैनिक यशसिध्दि न्यूज**

नाशिक महाविकास आघाडीचे उमेदवार वाजे यांच्या प्रचार बैठकीत आदित्य ठाकरे यांची आव्हान  राष्ट्रवादी उद्योग व व्यापारी भागाची प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांची उपस्थिती देशाच्या व राज्याच्या विकासासाठी जनतेने महाविकास आघाडीलाच साथ देण्यासाठी पावले उचलणे काळाची गरज आहे देशाला हुकुमशाही व महागाईच्या विळख्यात अजूनही अडकून न देण्यासाठी मतदाराद्वारे त्याला प्रतिबंध करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन राज्याची माजी पर्यटन तथा पर्यावरण व वातावरणीय बदल व रजिस्टाचार मंत्री आदित्य ठाकरे यांनी केले. नाशिक लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजाभाऊ वाजे यांच्या प्रचारार्थ झालेल्या या बैठकीत ठाकरेऑडिटोरियम हॉल सातापूर नाशिक येथे झालेल्या इंडस्ट्रियल फ्रंटॅलि मिलिटरी च्या गेट-टुगेदर या कार्यक्र मात आदिती ठाकरे यांनी महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना वरील. यावेळी पंढरपूर तालुक्यातील सुपुत्र आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शरदचंद्र पवार यांचे विश्र्वासू उद्योजक व व्यापार उद्योजक व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश एकनाथ फाटे यांनी यावेळी आवर्जून उपस्थित दर्शवीत आपले विचार व्यक्त केले यामध्ये येणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या मोठ्या प्रमाणावर मतदान करत महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार यांना भरघोस मताधिक्याने मिळून मताधिके मिळवून निवडून येतील असा विश्र्वासही पाटील यांनी व्यक्त केला आहे

भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठवण्याची योग्य वेळ आली असून त्यासाठी आपण सर्वांनीच एकत्र येत काम केले पाहिजे असा सल्लाही यावेळी आमदार नितीन भोसले यांनी दिला.यावेळी आयोजित कार्यक्रमास दिंडोरी लोकसभा प्रमुख व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष रामचंद्र पवार जिल्हाध्यक्ष कोंडाजी मामा आव्हाड सुधाकरराव बडगुजर जिल्हाध्यक्ष शिवसेना बोभाटा मा राजेश वैश्य महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स रमेश जी वैश्य चेअरमन यांच्या माजी अध्यक्ष एनआयएम याचे एम पवार माजी अध्यक्ष मधुकरराव रामनगर अध्यक्ष विवेक पाटील गडाख माझे अध्यक्ष संतोषजी मुंडे च्या माझे अध्यक्ष महाराज शंभर ऑफ कॉमर्स ज्ञानेश्र्वर गोपाल



# भिवरी येथे डोळे तपासणी आरोग्य शिबिर संपन्न

**पुरंदर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

प्राथमिक आरोग्य उपकेंद्र भिवरी तालुका पुरंदर जिल्हा पुणे व बुधरानी हॉस्पिटल कोरेगाव पार्क पुणे यांच्या वतीने अंधत्वातून दृष्टीकडे एक दिवशीय डोळे तपासणी( शिबिर )कार्यक्रम संपन्न बुधरानी हॉस्पिटल पुणे येथील आरोग्य अधिकारी श्री शुभम बाजारे यांनी एक दिवशी नेत्र तपासणी शिबिरामध्ये वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिकांची डोळे तपासणी करताना१ )चष्म्याचा नंबर तपासणी २)मोतीबिंदू तपासणी, ३)टेरिजियम,४)लासरू डीजीटी/डीसीआर,५)काचबिंदू,६)तिरळेपणा व इतर नेत्र विकाराबद्दल माहिती सांगून सर्वांची तपासणी केली भिवरी येथील उपकेंद्र मधील डॉ नीलम  निचित (समुदाय आरोग्य अधिकारी )श्री संतोष मर्ढेकर( आरोग्य सेवक) सौ सुजाता कटके (आरोग्य सेविका )तसेच अंजली लोणकर, मनीषा लोणकर,सुरेखा लोणकर,गंगावनी दळवी,शितल जगताप,अश्र्विनी शिंदे या सर्व अशा सेविका व आशा शिर्के मदतनीस या सर्वांनी मिळून नेत्र तपासणी शिबिर पार पडण्यास योग्य असे सहकार्य केले सदर नेतृत तपासणी शिबिराचा निश्र्चितच गरीब गरजू ज्येष्ठ नागरिकांना याचा फायदा होणार आहे.

# उजनी धरणातील अकरा टक्के पाणी कमी झाले

**पंढरपूर/प्रतिनिधी :**

उजनी धरणातून भीमा नदीच्या पात्रात सोलापूरसह नदीकाठच्या योजनांकरता सोडण्यात आलेले पाणी आता औज बंधाऱ्याच्या दिशेने जात आहे. गेले नऊ दिवस धरणातून पाणी सोडण्याची प्रक्रिया सुरू आहे. यामुळे जवळपास ११ टक्के पाणी कमी झाले आहे. २०२३ च्या पावसाळा हंगामात उजनी जलाशयासह भीमा खोऱ्यात कमी पाऊस झाल्याने सोलापूर जिल्ह्याची वरदायिनी असणारा हा प्रकल्प केवळ ६० टक्के उपयुक्त पातळीत भरला होता. मात्र त्याचवेळी लाभक्षेत्रातही पर्जन्यमान कमी असल्याने उजनीतून कालवा व नदीवाटे व अन्य योजनांमध्ये पाणी सोडावे लागले आहे. हे पाहता हा प्रकल्प मे महिन्याच्या मध्यालाच वजा ५० टक्के अशा स्थितीत पोहोचला होता तर आता १९ मे रोजी उजनी वजा ५५.७२ टक्के अशा स्थितीमध्ये आहे. मागील नऊ दिवसांपासून उजनी धरणातून सोलापूर, पंढरपूर, मंगळवेढा, सांगोला, शिरभावी योजना यासह नदीकाठच्या प्रकल्पांसाठी म्हणून पाणी सोडले जात आहे. यामुळे अकरा टक्के धरण खालावले आहे. दहा मे २०२४ पासून उजनीतून भीमा नदीमध्ये पाणी सोडण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. त्यावेळी धरण वजा ४४.६९ टक्के अशा स्थितीमध्ये होते तर आज १९ मे रोजी सकाळी हा प्रकल्प वजा ५५.७२ टक्के इतका खालावला आहे. धरणातील ११ टक्के पाणी कमी झाले आहे. उजनीची वाटचाल ही नीचांकी पाणी पातळीकडे सुरू असून २०१८-१९ ला हा प्रकल्प वजा ५९ टक्के अशा स्थितीमध्ये ३० जून रोजी पोहोचला होता. यंदा धरण वजा ६० टक्क्यांहून अधिक खालावणार आहे, हे निश्चित आहे. सोलापूरला पाणीपुरवठा करणाऱ्या औज बंधाऱ्यात पाणी पोहोचेपर्यंत भीमा नदीत पाणी सोडण्याची प्रक्रिया सुरू राहणार आहे. तोवर जवळपास साडेसहा टीएमसी पाणी सोडले गेले असेल. १० मे रोजी उजनी धरणातील एकूण पाणीसाठा हा ३९.७२ टीएमसी इतका होता तर आज १९ मे रोजी धरणात ३३.८१ टीएमसी पाणी शिल्लक आहे. ते मृतसाठातील पाणी असून भीमा नदीत जवळपास सहा टीएमसी पाणी या आवर्तनासाठी आतापर्यंत सोडले गेले आहे. उजनीच्या मृतसाठ्यातील २९.८५ टीएमसी पाण्याचा वापर यंदा झाला आहे. अद्यापही धरणातून सहा हजार क्युसेकने पाणी सोडले जात आहे. धरणातून भीमा नदीत सोडलेले पाणी शनिवारी रात्री वडापूर भागात पोहोचले होते. तेथून या पाण्याचा प्रवास पुढे सोलापूरला पाणीपुरवठा करणाऱ्या औज बंधाऱ्याकडे सुरू होता. वाढत्या तापमानामुळे उजनी धरणातील पाण्याचे बाष्पीभवनही वाढले आहे. मागील २४ तासात ७.५५ मिलीमीटर म्हणजेच ०.७० दशलक्ष घनमीटर इतक्या पाण्याचे बाष्पीभवन नोंदले गेले आहे.

उजनीची नीचांकी स्थिती पाहता या प्रकल्पाची भिस्त आता भीमा खोऱ्यात होणाऱ्या पावसावर अवलंबून आहे. यंदा धरण इतिहासातील सर्वात नीचांकी पाणी पातळीत पोहोचणार असून वजा पातळी भरून हे धरण पुन्हा उपयुक्त पातळीत ११० टक्के भरण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची गरज आहे.

जोवर भीमा खोऱ्यात चांगला पाऊस होत नाही, तोवर उजनीत पाणी येणे अशक्य आहे. यामुळे यंदा मान्सून लवकर सक्रिय होऊन तो मुबलक प्रमाणात उजनीला पाणी देणाऱ्या धरण परिसरामध्ये कोसळेल, अशी आशा आहे.

# आंबेडकरी चळवळीच्या दुर्मिळ साधनांचे जतन व्हावे..! : सुनील वारे



**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे ही महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था असून राज्यातील सर्व अनुसूचित जातीच्या विकासासाठी कार्यरत आहे. अनु जातीतील सर्व समाज घटकांना सामाजिक न्याय देऊन विकासाच्या मुख्य प्रवाहात आणताना समतेच्या चळवळीचा देखील परिचय झाला पाहिजे यासाठी आंबेडकरी चळवळीच्या दुर्मिळ दस्तेवजांजे संशोधन करून, संकलन करून जतन करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनील वारे यांनी केले आहे.

आंबेडकरी चळवळीच्या दुर्मिळ दस्तवेजाच्या शोधात मा.महासंचालक यांच्या निर्देशानुसार संशोधन विभागाची एक चमू नुकतीच अहमदनगर जिल्ह्याचा अभ्यास दौरा करून आली. विभाग प्रमुख श्रीमती वृषाली शिंदे यांच्या मार्गदर्शनात संशोधन विभागाचे डॉ. प्रेम हनवते, डॉ. संभाजी बिरांजे, विनायक भालेराव यांची चमू दीनमित्रकार मुकुंदराव पाटील ग्रंथालय तथा संशोधन केंद्र तरवडी ता. नेवासा येथे गेली. सुमारे ११४ वर्षांपूर्वी मुकुंदराव पाटील यांनी सत्यशोधक चळवळीला वाहिलेले दीनमित्र हे साप्ताहिक १९१०ते १९६७ म्हणजे ५७ वर्ष अखंडपणे चालविले. या संशोधन केंद्रात दीनमित्रचे सर्व वर्षाचे अंक जपून ठेवले आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुकुंदराव पाटील यांना १२/६/१९२७ साली आलेले पत्र देखील मुकुंदराव पाटील यांचे नातू उत्तमराव पाटील यांनी जपून ठेवले आहेत. अहमदनगर नगर येथील सिद्धार्थ कॉलनी मधील पंचशील विद्यालयाच्या प्रांगणात असलेल्या सोमवंशी बोर्डिंगला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ११फेब्रुवारी १९३६साली भेट देऊन सवाळेराम गायकवाड यांच्या कार्याचे कौतुक केले. डॉ. आंबेडकर यांचे अनुयायी असलेल्या सावळेराम गायकवाड यांनी १९२४ साली हे बोर्डिंग सुरु करून मागासवर्गीय विध्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय केली. या वर्षी या बोर्डिंगच्या स्थापनेस शंभर वर्ष पूर्ण होत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शेरा या संस्थेने जपून ठेवला आहे. अहमदनगर महाविद्यालयात

१९३४ साली सुरु करण्यात आलेल्या ज्ञानोदयचे सर्व अंक जपून ठेवले असुन महात्मा फुले यांच्या शाळेतील विदयार्थीनी मुक्ता साळवे यांचा मांग महाराच्या दुःखाचा निबंध १८५५ च्या अंकात पाहायला मिळतो तसेच महात्मा फुले यांची चळवळ,तिला सहकार्य करणारे लहुजी वस्ताद साळवे यांचे संदर्भ ठिकठिकाणी आढळून येत असल्याचे संशोधन चमुने सांगितले.

बार्टीच्या या संशोधन चमूला अहमदनगर नगर येथील सामाजिक कार्यकर्ते भैरवनाथ वाकले, प्रा.डॉ सय्यद महेबूब,संध्या मेडे, अनंत लोखंडे असिफ खान प्रा. जयंत गायकवाड, सुमेध गायकवाड, प्रा. बेदरकर इत्यादीनी अमूल्य सहकार्य केले.

आंबेडकरी चळवळीची व्याप्ती खूप मोठी असून महाराष्ट्रासह देश विदेशातही आंबेडकरी चळवळीची दुर्मिळ साधने दुर्लक्षित आणि अप्रकाशित आहेत. अशया दस्तावेजांचा शोध घेऊन त्यांचे संकलन, संपादन आणि संवर्धन करण्याचे बार्टी महासंचालक यांनी संशोधन विभागाला आजच्या बैठकीत निर्देश दिले आहेत.

# खैराट येथे तालुका कृषी अधिकारी कार्यालय अक्कलकोटच्या वतीने

## खरीप पूर्व हंगाम शेतकरी प्रशिक्षण संपन्न




**अक्कलकोट/प्रतिनिधी**

खैराट येथे तालुका कृषी अधिकारी कार्यालय अक्कलकोटच्या वतीने खरीप पूर्व हंगाम शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजिन करण्यात आली होते सदर कार्यक्रमात येणाऱ्या खरीप हंगामात आपल्या कडे घरात उपलब्ध असलेले बियाणे उगवण क्षमता चाचणी करून कशी तपासणी करावी यांचे याचे प्रात्यक्षिक करून सविस्तर माहिती कृषी पर्यवेक्षक सतिशकुमार वाघमोडे यांनी शेतकरी बांधवांना सांगताना कृषी सेवा केंद्रातून एकदा प्रमाणित तूर उडीद मूग सोयाबीन इत्यादीचे बियाणे पॉकेट विकत आणल्यावर पुढील तीन वर्षांपर्यंत तेच बियाणे आपण पेरणी साठी वापरू शकतो तसेच दरवर्षी बियाणे विकत घेण्याची गरज नाही आर्थिक विचार केला तर शेतकऱ्यांकडील बियाणे आणि दुकानातून आणलेल्या बियाणांची किंमत दुपटीने असते घराचे बियाणे वापरल्यास उत्पादन खर्च कमी करत येती तसेच,

बियाण्याची बीज प्रक्रिया करूनच पेरणी करावी याबद्दल कृषी सहाय्यक श्री अभिषेक जोजन यांना बोलताना जशी लहान बालकांना पोलिओ लसीकरण महत्वाचे असते त्याच प्रमाणे बियान्याला मर रोगा पासून वाचवण्यासाठी ट्रयाकोड्मा हे जैविक बुरशी नाशक तसेच एन पी के कन्सोर्शिया (रायजोबियम नत्र स्थिरिकरणासाठी ,पी एस बी स्पुरद विरगळण्यासाठी ,के एम बी पालाश उपलब्ध होण्यासाठी ) बीजप्रक्रिया करूनच पेरणी करावी याचे प्रात्यक्षिक व सविस्तर महत्व सांगितले कार्यक्रमाचे प्रास्ताविक गावाचे कृषी सहाय्यक श्री आनंद कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन गावाचे कृषी सहाय्यक श्री सिद्धाराम शिरर्गापूरे यांनी केले सर्व शेतकरी बांधवांनी एकत्र मिळून बियाणे उगवण क्षमता तपासणी करूनच आणि बीजप्रक्रिया करूनच पेरणी करणार असा सर्व शेतकरी बांधवांनी निश्र्चय करण्यात आला

यावेळी उपस्थित कृषी सहाय्यक श्री चिदानंद खोबन श्री श्रीकांत पाटील व गावातील शेतकरी बांधव उपस्थित होते

# निवडणूक होताच अभिजीत पाटलांनी लावला कामाचा सपाटा उपमुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन केली शेतकऱ्यांसाठी मागणी

चेअरमन अभिजीत पाटील यांनी उपमुख्यमंत्री ना देवेंद्र फडणवीस यांचेकडे केली होती मागणी करून दिल्या संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ दिल्या सूचना

**यावर्षी पाऊस चांगला आहे.नदीत आलेले पाणी किमान २ महिने पुरेल पण लाईट नसेल तर पाणी असून काही फायदा शेतकर्याला होणार नाही. पाणी वाया जाईल व उभी पीके जळून जातील. त्यामुळे सध्या अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना बळ देण्यासाठी आपण हि मागणी केली होती. याची दखल उपमुंख्यमंत्री देंवेद्र फडणवीस यांनी घेत पिण्याचे पाणी ठेऊन शेतीस लाईट सुरु करण्याच्या सूचना दिल्यामुळे शेतकऱ्यांना खुप मोठा दिलासा मिळेल अशी प्रतिक्रिया चेअरमन अभिजीत पाटील यांनी दिली आहे.**



**पंढरपूर/प्रतिनीधी :**

लोकसभा निवडणुकीत भाजपला विठ्ठलचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी साथ दिली होती. त्यामुळे या सत्तेचा उपयोग जनतेच्या विकासासाठी आणि विठ्ठलच्या सभासदांसाठी करण्याबाबतची भूमिका घेत , शासन दरबारी विविध प्रश्र्न मांडण्यासाठी सुरुवात केली आहे. याचाच एक भाग म्हणून पिण्याचे पाणी सोडून भीमा नदीकाठचा वीजपुरवठा किमान आठ तास करण्यात यावा. ही पहिलीच मागणी करताच त्यावर तात्काळ दखल घेत वीज पुरवठा ८ तास करण्यास सूचना दिल्या..

मुंबई येथे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी भेट घेऊन, वरील मागणीचे निवेदन देण्यात आले होते. याची दखल घेतली असल्याचे दिसून आले आहे. राज्यामध्ये गतवर्षी पाऊसमान अत्यल्प झाला आहे सध्या उन्हाची तीव्रता पाहता शेतकऱ्यांच्या व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्र्न निर्माण झालेला आहे. शेतकरी अहोरात्र मेहनत करून पिके जगविण्याचा प्रयत्न करीत असून अशा तीव्र उन्हाळयामध्ये पिकांना पाण्याची नितांत गरज आहे. सध्या भीमा नदीकाठचा वीज पुरवठा २ तासच असल्यामुळे पिकांना पाणी देताना अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे शेतातील उभी पिके करपु लागल्याचे दिसत आहे. यामुळे लागवडीचा खर्चही निघत नसल्यामुळे बळीराजा आर्थिक अडचणीत सापडलेला आहे. भिमा नदीकाठच्या गावांमधील शेतकऱ्यांच्या पाईपलाईन ह्या नदीपासून १५ ते २० हजार फुट अंतरावर असल्यामुळे कमी वेळेत पाणी पुरवठा होत नसल्यामुळे जनावरांस पिण्यासाठी पाणी मिळत नाही. जर हा विद्युत पुरवठा २ तासा ऐवजी ८ तास सुरू ठेवल्यास जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचीही सोय होईल, सदर वीज पुरवठ्याची वेळ वाढविणेबाबत वारंवार शेतकऱ्यांकडून मागणी होत होती.यामुळे श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथे भेट घेऊन पत्राद्वारे मागणी केली असता, त्यावर संबंधिताना आदेश देऊन लवकरच तोडगा काढण्याचे आश्र्वासन दिले आहे. त्यामुळे हा वीजपुरवठा मंगळवार पासून सुरू होणार आहे. यामुळे शेतकऱ्याची अडचण दूर होणार आहे.

# भिवरी येथे डोळे तपासणी आरोग्य शिबिर संपन्न



**पुरंदर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

प्राथमिक आरोग्य उपकेंद्र भिवरी तालुका पुरंदर जिल्हा पुणे व बुधरानी हॉस्पिटल कोरेगाव पार्क पुणे यांच्या वतीने अंधत्वातून दृष्टीकडे एक दिवशीय डोळे तपासणी( शिबिर )कार्यक्रम संपन्न बुधरानी हॉस्पिटल पुणे येथील आरोग्य अधिकारी श्री शुभम बाजारे यांनी एक दिवशी नेत्र तपासणी शिबिरामध्ये वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिकांची डोळे तपासणी करताना१ )चष्म्याचा नंबर तपासणी २)मोतीबिंदू तपासणी, ३)टेरिजियम,४)लासरू डीजीटी/ डीसीआर,५)काचबिंदू,६)तिरळेपणा व इतर नेत्र विकाराबद्दल माहिती सांगून सर्वांची तपासणी केली भिवरी येथील उपकेंद्र मधील डॉ नीलम निचित (समुदाय आरोग्य अधिकारी )श्री संतोष मर्ढेकर( आरोग्य सेवक) सौ सुजाता कटके (आरोग्य सेविका )तसेच अंजली लोणकर, मनीषा लोणकर,सुरेखा लोणकर,गंगावनी दळवी,शितल जगताप,अश्र्विनी शिंदे या सर्व अशा सेविका व आशा शिर्के मदतनीस या सर्वांनी मिळून नेत्र तपासणी शिबिर पार पडण्यास योग्य असे सहकार्य केले सदर नेतृत तपासणी शिबिराचा निश्र्चितच गरीब गरजू ज्येष्ठ नागरिकांना याचा फायदा होणार आहे.

# स्वेरीत ‘राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवसा’च्या निमित्त कार्यशाळा संपन्न

**पंढरपूर/प्रतिनिधी:**

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाच्या ‘मेसा’ अर्थात मेकॅनिकल इंजिनिअरिंग स्टुडन्टस असोसिएशन आणि ‘आयआयसी’ अर्थात इन्स्टिट्यूशन इनोव्हेशन कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने ‘राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवसा’च्या निमित्ताने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला विद्यार्थी व प्राध्यापकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला.

स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली ‘राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवसा’च्या निमित्ताने आयोजिलेल्या या कार्यशाळेत डॉ.एन.यु.कौटकर हे प्रमुख मार्गदर्शन करत होते. प्रास्तविकात मेसाचे समन्वयक प्रा. संजय मोरे




यांनी कार्यशाळेचा हेतू स्पष्ट केला. पुढे माहिती देताना डॉ.कौटकर म्हणाले की, ‘भारतात दरवर्षी ११ मे रोजी ‘राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस’ साजरा केला जातो. हा दिवस भारताच्या तांत्रिक प्रगती आणि यशाचे स्मरण करून देतो. दि.११ मे, १९९८ रोजी भारताने राजस्थानमधील भारतीय सैन्याच्या पोखरण चाचणी रेंजवर शक्ती-१ या अणु क्षेपणास्त्राची पहिली यशस्वी चाचणी घेतली. ‘राष्ट्रीय तंत्रज्ञान दिनाचे महत्त्व अणुचाचण्यांच्या पलीकडे भारताच्या तांत्रिक पराक्रमाची आणि विविध क्षेत्रांतील नवकल्पना साजरे करण्यासाठी आहे.

भारताच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगती आणि देशाच्या विकासासाठी भारतीय शास्त्रज्ञ, अभियंते आणि तंत्रज्ञांनी केलेल्या योगदानाचे स्मरण व्हावे म्हणून हा दिवस साजरा केला जातो. ‘राष्ट्रीय तंत्रज्ञान दिना’निमित्त देशभरात विविध कार्यक्रम, परिसंवाद आणि परिषदा आयोजित केल्या जातात ज्यामुळे वैज्ञानिक वृत्ती आणि तांत्रिक नवकल्पनांना चालना मिळते. भारताच्या तांत्रिक प्रगतीत योगदान देणाऱ्या शास्त्रज्ञ आणि अभियंत्यांच्या प्रयत्नांना ओळखण्याचा आणि त्यांचा सन्मान करण्याचा आणि तरुण पिढीला विज्ञान आणि तंत्रज्ञानात करिअर करण्यासाठी प्रेरित करण्याचा हा दिवस आहे. अलिकडच्या वर्षांत कृत्रिम बुद्धिमत्ता, जैवतंत्रज्ञान, अंतराळ संशोधन आणि माहिती तंत्रज्ञान यासारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानातील भारताच्या कामगिरीचे प्रदर्शन करण्यासाठी राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवसाचा वापर केला जातो. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील भारताच्या प्रवासावर चिंतन करण्याचा आणि नाविन्यपूर्ण प्रगती आणि विकासाला चालना देणाऱ्या भविष्याची कल्पना करण्याचा हा दिवस आहे. यावेळी विभागप्रमुख डॉ. एस.बी. भोसले यांच्यासह महाविद्यालयातील इतर प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. संजय मोरे मेसा समन्वयक यांनी केले

# उद्योजक खरे यांचे विविध गावात जंगी स्वागत

**पंढरपूर/प्रतिनिधी :**

मोहोळ विधानसभा राखीव मतदार संघात उद्योजक राजू खरे यांनी आपल्या कर्तुत्वाने वेगळी झलक निर्माण केली आहे. या मतदार संघातील कोणत्याही कार्यक्रमासाठी खरे यांना निमंत्रण दिली जात आहेत. एवढ्यातच साजरी करण्यात आलेल्या छत्रपती संभाजी महाराज यांचे जयंतीनिमि त्त विविध मंडळांनी आवर्जून बोलावले होते. यावेळी खरे यांनी निमंत्रणाचा स्वीकार करीत उपस्थिती लावली. गावोगावी जंगी स्वागत करण्यात आले. छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त मोहोळ शहरातील सर्वात मोठा जयंती उत्सव सोहळा जय महाराष्ट्र प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विकी पंडितराव देशमख या यांनी साजरा केला होता. उत्सव सोहळ्यातील मुख्य कार्यक्रम असलेल्या जंगी मिरवणुकीत प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक राजू खरे यांना निमंत्रण देण्यात आले होते.आरती करून मिरवणुकीचा नारळ फोडून शुभारंभ करण्यात आला. यावेळी वरील प्रतिष्ठानच्या वतीने मोहोळचे संभाव्य उमेदवार राजू खरे यांचा सत्कार करण्यात आला .